दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ७९ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१२ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# देशात प्रथम क्रमांकाचे राज्य बनवण्याला प्राधान्य-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## आयबीएन १८ च्या 'अजेंडा सशक्त महाराष्ट्राचा' कार्यक्रमात ग्वाही

**नागपूर : कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग, व्यापार, पायाभूत सोयीसुविधा आदी सर्वांगीण विकासाच्या बाबतीत लोकाभिमुख कारभारातून राज्याला देशात प्रथम क्रमांकाचे बनविण्याला शासनाचे प्राधान्य असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे आय बी एन १८ वृत्तवाहिनीच्या 'अजेंडा सशक्त महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात दिली.वृत्तवाहिनीचे संपादक आशुतोष पाटील यांनी घेतलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलखुलास उत्तरे दिली.राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधा उभारणीवर राज्य शासनाचा भर असून, उद्योग, व्यापारवाढीवर विशेष लक्ष देण्यात येत आहे. शासनाने सुरुवातीलाच दावोस येथे जावून १ लाख ३४ हजार कोटीवर विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले आहेत. भविष्यातही अनेक कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले जातील, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.राज्य शासनाने महात्मा जोतीराव फुले जन आरोग्य योजनेची मर्यादा ५ लाख रुपयांवर केली असून, कँशलेस सुविधा देणे हा पुढील टप्पा असल्याचे सांगत राज्यातील गरीब जनतेला घराजवळच आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने सुरु केले आहेत. आतापर्यंत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून मोठी रक्कम वितरीत करून अनेक रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात राज्य शासनाचे उत्तम काम सुरु असन, राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांची उभारणी करण्यात येत आहे. देशात सर्वाधिक प्रकल्प राज्यात सुरु असल्याचे सांगून, नागपूर ते मुंबई हा हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र एक्सप्रेस वे अर्थात समृद्धी महामार्ग गेमचेंजर ठरला असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.मुंबई - पुणे हा बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतील महामार्ग केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रत्यक्षात साकारला. शिवडी - न्हावा शेवा - चिरले हे अंतर २० मिनिटांवर आले असून, कोस्टल रोड, वर्सोवा - मिरा भाईंदर, वसई -विरार - अलिबाग, मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई मेट्रो २ ते ७ आदी प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी माहिती दिली.शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी हे सरकार उभे असून, गेल्या दीड वर्षात विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना हजारो कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. त्यामध्ये पूर्वीच्या दोन हेक्टर ऐवजी तीन हेक्टरपर्यंत नुकसान भरपाईसाठी वाढ करण्यात आली आहे. राज्यात नुकताच अवकाळी पाऊस, गारपीट झाल्यामुळे पिकांच्या नुकसान भरपाईसाठी तात्काळ पंचनामे करण्यात येत आहेत. केंद्र सरकारप्रमाणे शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेच्या माध्यमातून वार्षिक ६ हजार रुपये देणारे देशातील पहिलेच राज्य असल्याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले.केंद्र शासनासोबत चांगले संबंध असल्यामुळे राज्याच्या विकासासाठी लागणारा निधी मिळत आहे. शासन आपल्या दारी उपक्रमातून आतापर्यंत १ कोटी ९० लाख नागरिकांना लाभ वितरीत करण्यात आले. महिलांसाठी एस टी बस भाड्यात ५० टक्के सवलत, तसेच लेक लाडकी योजनेतून मुलीला तिच्या जन्मापासून १८ वर्षाची होईपर्यंत ७५ हजार रुपयांच्या निधीची मदत करण्यात येत आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून त्यांच्या सबलीकरणाचे धोरण



राबविण्यात येत असल्याकडे मुख्यमंत्री शिंदे यांनी लक्ष वेधले.मराठा समाजाच्या मुलांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातून ५० हजार रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करून दिला जात आहे. आतापर्यंत ७० हजार मुलांनी याचा लाभ घेतल्याची माहिती त्यांनी दिली. राज्य शासनाने कोट्यवधी रुपयाचे व्याज भरले असून, महिलांनाही याचा लाभ होत आहे. ओबीसी समाजातील मुलांना मिळणाऱ्या सवलती सांगताना त्यांनी परदेशी शिष्यवृत्ती योजना, सारथीच्या माध्यमातून केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये याची मदत होत असल्याचे ते म्हणाले.राज्य शासन सर्व समाजाच्या पाठीशी उभे असून, मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही, यासाठी मागासवर्ग आयोग त्याचे काम करत असल्याचे ते म्हणाले. शिवाय मराठा समाजाचे आरक्षण, सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात येत असलेले पुरावे, इंपिरीकल डेटा, शिंदे समिती, मराठा आंदोलन आदी विषयांवर त्यांनी उत्तरे दिली. मराठा आंदोलनादरम्यान घडलेल्या अप्रिय घटनांबाबत बोलताना त्यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगून, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्यामुळे सर्वांनी याची खबरदारी घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.मुंबईमध्ये २-३ वॉर्डातील स्वच्छता कर्मचारी एकत्र आणून काम केल्यास त्याचा परिणाम दिसून येतो. लोकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती होते. त्यात लोकसहभाग वाढत आहे. त्यातून स्वच्छतेची चळवळ सुरु होईल, असे सांगून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात स्वच्छ भारत अभियान सुरु केले आहे. आता ही चळवळ बनली असून, धारावीतील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्याचा कायापालट करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला. तसेच विकासाला सर्वांनी सहकार्य करावे. विकास प्रकल्पाला विरोध करू नये, राज्याचा सर्वांगीण विकास होताना सर्वांनी सहकार्य करण्याची अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली

## कबड्डी हा खेळ स्पर्धात्मक खेळ म्हणून लोकप्रिय-चोखारे



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कबड्डी खेळ भारतीय उपखंड आणि इतर आसपासच्या आशियाई देशांमध्ये लोकप्रिय आहे. भारताच्या इतिहासात कबड्डी हा खेळ स्पर्धात्मक खेळ म्हणून लोकप्रिय असल्याचे प्रतिपादन काँगेसचे नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनेश दादापाटील चोखरे यांनी केले. घोनाड ता. भद्रावती येते आयोजित स्व. नानाजी धर्माजी मत्ते (पाटील) यांच्या स्मृती प्रित्यर्थ भव्य पुरुषांचे कबड्डी सामन्यादरम्यान ते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.

यावेळी नामदेवराव नानाजी मत्ते, तुळशीराम नानाजी मत्ते, सूर्यभान नानाजी मत्ते, वासुदेव नानाजी मते,श्नीलकंठ धर्माजी माटे, आत्माराम धर्माजी मत्ते, महादेव किसना माटे, मधुकर गोसाई आवरी, राजेश नं. मॅटे, शरद वा. शेरकी, सुभाष रा. आक्रे, विजय एल. मॅटे, अरुण एस. शेरकी, यांचेसह भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश सचिव करण संजय देवतळे, भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अमित छ. गुंडावार, माजी सदस्य यशवंत वाघ , ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विनोद सातपुते , नागोजी बहाडे (माजी उपाध्यक्ष पं. एस. भद्रावती), जगदीश निळकंठ मत्ते (माजी सरपंच ग्राम पं. घोनाड), महेंद्र भोईर (सरपंच ग्रा.पं. घोनाड), प्रशांत विठोबा बोंडे (उपसरपंच ग्राम पं. घोनाड), अवघड (ग्रामसेवक, घोनाड), प्रविण शेरकी (पोलीस पाटील, घोनाड), महेश येउल (सामुदायिक आरोग्य अधिकारी, घोनाड),बेळे (आरोग्य सेवक, घोनाड) वरील मान्यवरांच्या उपस्थितीत होते. पुढे बोलतांना ते म्हणले कि कबड्डी हा एक भारतीय सांघिक खेळ आहे, भारताच्या इतिहासात कबड्डीचे खेळ स्पर्धात्मक खेळ म्हणून लोकप्रिय झाला. त्यामुळे लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण होत.यावेलो मान्यवरांनि समयोचित मार्गदर्शन केले. भव्य पुरुषांचे कबड्डी सामन्याच्या आयोजनासाठी मत्ते परिवार आणि समस्त आयोजकांनी अथक परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामार्फतअवघ्या १७ महिन्यांमध्ये तब्बल १५६ कोटींपर्यंत अर्थसहाय्य

## मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण मदतीविना वंचित राहता कामा नये : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे.या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता महाराष्ट्र राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. गोरगरीब - गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत असल्याने मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत.

आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने अवघ्या १७ महिन्यात १९ हजार पेक्षा अधिक गोरगरीब -गरजू रुग्णांना एकूण १५६ कोटी ६० लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे.मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारताच महाविकास आघाडी सरकारच्या

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष

काळात बंद पडलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष तात्काळ सुरू केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या मंगेश नरसिंह चिवटे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मागील जुलै महिन्यात १७८ रुग्णांना ७६ लाखांची मदत देण्यात आली.ऑगस्ट महिन्यात २४४ रुग्णांना १ कोटी १ लाख,सप्टेंबर महिन्यात ३१९ रुग्णांना १ कोटी ८६ लाख,ऑक्टोबर महिन्यात २७६ रुग्णांना २ कोटी ३५ लाख,नोव्हेंबर महिन्यात ५२७ रुग्णांना ४ कोटी ५० लाख,डिसेंबर महिन्यात १०३१ रुग्णांना ८ कोटी ५२ लाख,जानेवारी २०२३ मध्ये १०३२ रुग्णांना ८ कोटी ९० लाख तर फेब्रुवारी २०२३ मध्ये १२७४ रुग्णांना १० कोटी ५९ लाख,मार्च २०२३ मध्ये १४६९ रुग्णांना ११ कोटी ९३ लाख,एप्रिल मध्ये ११९० रुग्णांना ९ कोटी ९१ लाख,मे मध्ये १३२९ रुग्णांना ११ कोटी २५ लाख,तर जून मध्ये १७२८ रुग्णांना १४ कोटी ६२ लाख,जुलै १४८८ रुग्णांना १२ कोटी ७२ लाख,ऑगस्ट मध्ये १५६७ रुग्णांना १३ कोटी १४ लाख,तर सप्टेंबर मध्ये विक्रमी १४०८ रुग्णांना ११ कोटी ७७ लक्ष रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता मदत मिळवण्यासाठी मंत्रालयात जाण्याची ही गरज नाही पूर्णपणे ऑनलाईन प्रोसेस करून वैद्यकीय मदत मिळणार असल्याचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी सांगितले. यासाठी८६५०५६७५६७या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळविता येईल.मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मध्ये विविध आजारांचा समावेश देखील करण्यात आला असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी दिली आहे.यामध्ये अँजिओप्लास्टी,बायपास सर्जरी,कर्क रोगावरील शस्त्रक्रिया,केमोथेरपी,डायलिसिस,जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया,सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया,रस्ते अपघात,विद्युत अपघात,भाजलेले रुग्ण,जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे.

# रस्त्यावर आल्याशिवाय दिल्लीला कळत नाही आज दिल्लीचीही झोप उडाली असेल-शरद पवार

**नाशिक**-सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाला किंमत मिळत नाही. आम्हाला रस्त्यावर येण्याची हौस नाही, पण, रस्त्यावर आल्याशिवाय दिल्लीला कळत नाही असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. तसेच कांदा निर्यात बंदी करून शेतकऱ्यांची चेष्टा करण्यात येत असल्याचेही पवारांनी म्हटले आहे.केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली असल्याने कांद्याचे दर घसरले आहेत. यामुळे राज्यभरात शेतकऱ्यांमध्ये संताप पाहायला मिळत आहे. दरम्यान आज कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष शरद पवार मैदानात उतरले आहेत. आज पवारांच्या उपस्थितीत नाशिकच्या चांदवडमध्ये रास्तारोको आणि सभा झाली. याच सभेतून पवारांनी सरकारवर निशाणा साधला आहे.पुढे पवार म्हणाले, ''आज इथं आपण आलो, रस्त्यावर बसलो, माझी खात्री आहे की दिल्लीचीही झोप उडाली असेल. आज सकाळपासून मी टीव्हीवर बघत आहे की राज्यातील विविध नेते बोलत



आहेत की आम्ही केंद्र सरकारशी चर्चा करणार, हा निर्णय बदलणार, असं म्हणतायत. याआधी हा प्रश्न निर्माण झाल्यापासून कोणाला आठवण आली नाही. मात्र त्यांना जेव्हा कळलं की चांदवडमध्ये सर्व लोक एकत्र जमून आपली शक्ती दाखवणार आहेत, तेव्हाच सरकार दरबारी हालचाल सुरू झाली. तरीही एवढ्यावरच समाधान मानून आपल्याला चालणार नाही, लक्ष ठेवावं लागेल. कारण सध्याचे राज्यकर्ते शेतकऱ्यांसाठी योग्य धोरण आखणारे नाहीत'', असेही पवार म्हणाले.यावेळी बोलतांना पवार म्हणाले की, तुम्ही सगळे कष्ट करतायत, पण सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाला किंमत मिळत नाही. ज्यांच्या हातात धोरणं ठरविण्याचे अधिकार आहेत, त्यांना जाणीव नसेल तर शेतकरी उध्वस्त होण्यास वेळ लागणार नाही असेही पवार यांनी म्हंटले आहे.मी मागे मनमाडला आलो होतो, तेव्हा मला काही शेतकऱ्यांनी सांगितले की, कांदा संदर्भात काही निर्णय केंद्र सरकार घेत आहे. त्यामुळे मी कार्यक्रम थांबवून तत्काळ दिल्लीला गेलो. त्यावेळी, भाजपचे लोके कांद्याच्या माळ गळ्यात घालून आले होते. याबाबत अध्यक्षांना विचारल्यावर कांद्याचे भाव खूप वाढल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कांद्याचे दर कमी करता येणार नाही का? असे मला अध्यक्षांनी विचारले. त्यावर, दोन पैसे शेतकऱ्यांना मिळत असतील तर मिळू द्या असे मी त्यांना सांगितले, असल्याच पवार म्हणाले.केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. याविरोधात राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. राज्यातील बळीराजा आक्रमक झाला असून रस्त्यावर उतरला आहे. आता या कांदा निर्यातबंदीविरोधात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी शरद पवार हे देखील थेट मैदानात उतरले आहेत. आज पवारांच्या उपस्थितीत चांदवडमध्ये रास्तारोको आणि सभा होत आहे. मुंबई-आग्रा महामार्गावर चांदवड चौफुली येथे हे रास्तारोको आंदोलन केले जात आहे.

## संपादकीय

# ‘लवकर उठे’ ला टाटा?



‘लवकर निजे, लवकर उठे, तया ज्ञान, आरोग्य, संपत्ती भेटे’, असे सुभाषित पूर्वी प्रसिद्ध होते. भारतीय संस्कृतीचा तो एक संस्कारही समजला जाई. काळ बदलला, तसा संस्कृती व संस्कारांचा अर्थही बदलत चालला आहे. आता उशिरा निजणे ही फॅशन समजली जाऊ लागली आहे. आजच्या संस्कृतिरक्षकांनीही त्याची री ओढावी, हा एक सांस्कृतिक धक्काच आहे. या पार्श्वभूमीवर शाळांच्या वेळा बदला, या राज्यपाल रमेश बैस यांच्या सूचनेकडे पाहावे लागेल.शाळकरी मुलांची पुरेशी झोप होत नसल्याने ताणतणावासह आरोग्याच्या तक्रारी येत असल्याची वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. राज्यपालांच्या सूचनेमागेही हाच विचार असावा. तरीही त्यामुळे उशिरा झोपण्याला उत्तेजन मिळू शकते, अशी रास्त भीती शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते व्यक्त करतात. गेल्या काही वर्षांत केवळ उच्चभ्रू वर्गातच नव्हे, तर सर्वसामान्यांतही टीव्ही, मोबाइल, उशिराच्या पार्ट्या वा कार्यक्रमांमुळे कुटुंबीयांची झोपेची वेळ रात्री बाराच्या पुढे सरकत चालली आहे. स्वाभाविकच मुलेही उशिरा झोपतात व शाळेसाठी लवकर उठावे लागल्याने त्यांना पुरेशी झोप मिळत नाही. अशा पालक व मुलांसाठी शाळांची वेळ बदलणे, हे एकप्रकारे उशिरा झोपण्याला उत्तेजन देण्यासारखे आहे. शाळेच्या धाकाने अनेक घरे रात्री लवकर निद्राधीन होऊन प्रात:काली जागी होतात. शाळांची वेळ बदलल्यास हे उरलेसुरले बंधनही गळून पडण्याची भीती आहे. अनेक शाळा दोन सत्रांत भरतात.पहिले सत्र उशिरा सुरू झाल्यास नंतरच्या सत्रालाही विलंब होणार, मुले उशिरा घरी येणार. मग त्यांना खेळ, गृहपाठ, शिकवणीवर्ग या साऱ्यांना वेळ कोठून मिळणार, असाही प्रश्न निर्माण होतो. तथापि, मुलांच्या आरोग्याचा विचारही दुर्लक्षिता येणार नसल्याने शाळांच्या वेळेबाबतच्या प्रश्नाला सोपे वा एका वाक्यात उत्तर देता येण्यासारखे नाही. पाल्यांच्या आरोग्याची काळजी महत्त्वाची आहेच. त्यासाठी स्वत:सह मुलांनी रात्री लवकर झोपावे, यासाठी पालकांनी प्रामाणिक प्रयत्न करायला हवेत. शाळांनीही मध्यममार्ग काढून गरज असेल, तेथे वेळांची लवचिकता वाढवायला हवी. अनेक शाळा तीव्र ऊन वा थंडीच्या काळात असे बदल करीत असतातच. त्यामुळे केवळ राज्यपालांनी सूचना केली, म्हणून तिची सरसकट अंमलबजावणी करणे किंवा डोळे झाकून विरोध करणेही तितके व्यवहार्य नाही. कोणतेही सरसकटीकरण अंतिमत: चुकीचे व सर्जनशीलतेला मारकच असते. राज्यपालांनाही ते अपेक्षित नसावे.

# एक नासका आंबा...

व्यक्ती आज कशी आहे, ते त्याच्या/ तिच्या भूतकाळावर अवलंबून असते. एखाद्या सहकर्मचाऱ्यांने कामचुकारपणाचे फायदे भूतकाळात अनुभवले असतील, कुठलीच जबाबदारी न घेता, स्वत:ला कुठलीच तोशिश न पडता त्याचे आयुष्य पुढे जात असेल, तर ती सवय, जीवनशैली व्यक्तीच्या अंगवळणी पडते. असे कामचुकार अनेक ऑफिसमध्ये असतात.मनोज ऑफिसमध्ये पुरता वैतागला होता. त्याचा सहकारी कमलेश कामचुकारपणा करत राहायचा आणि वरिष्ठांची बोलणी मात्र मनोजला ऐकावी लागायची. कमलेश ऑफिसमध्ये येऊन ‘पाट्या टाकण्यास’, कामाच्या वेळेत इतर कर्मचाऱ्यांच्या टेबलापाशी जाऊन त्यांच्याशी इकडच्या-तिकडच्या गप्पा, टाइमपास करणारा म्हणून प्रसिद्ध होता. मनोजला कमलेशबरोबर काम करणे असह्य झाले होते. कमलेशच्या कामचुकार वर्तनाबद्दल मनोजने वरिष्ठांशी चर्चा केली होती; पण पुढे काही झाले नाही. ‘जैसे थे’ सुरूच राहिले. मनोज दुसरी नोकरी शोधू लागला.कामावर उशिरा येणे, आल्यावर आरामात कॉफी घेणे, अर्धा-पाऊण तास थोडे काम केले की, किती मी दमले असे म्हणत परत ब्रेक घेणे, मग लंचब्रेक आणि नंतर थोडे फार काम केले, की घरी जाण्याचे वेध लागणे असा ॲनीचा ऑफिसमधील दिनक्रम. आठ तासांतील जेमतेम दीड ते दोन तास काम करून, पगार मात्र पूर्ण मिळणे हे ॲनीच्या बाबतीत अनेक वर्षे सुरू होते आणि त्याबद्दल ऑफिसमधील कुणी काही बोलत नसे. वार्षिक ‘अप्रेझल’दरम्यान ॲनीच्या कामातील ढिलाईबद्दल, तिच्या उशिरा येण्याबद्दल नकारात्मक टिप्पणी होऊनही, ॲनीच्या कामात-वागण्यात फरक पडला नव्हता. मनुष्यबळ विभाग प्रमुख तिच्याशी बोलले असता, तिने उलट त्यांनाच धमकावले, की ती त्यांच्या विरोधात वरिष्ठांकडे तक्रार करेल. मनुष्यबळ विभाग प्रमुखांनी गप्प राहण्याचे धोरण स्वीकारले. वरिष्ठ तिच्या या वागण्याकडे दुर्लक्ष करत होते आणि ते ऑफिसमधील इतर कर्मचाऱ्यांच्या असमाधानाचे मोठे कारण होते.लहान-मोठ्या आस्थापनांमध्ये कमलेश, ॲनीसारखे कर्मचारी असतात. सचोटीने काम करण्यापेक्षा काम टाळण्यात स्वत:ची सारी ऊर्जा आणि हुशारी पणाला लावण्यात धन्यता मानणारे! काही कर्मचाऱ्यांच्या अशा वागण्याचा इतर कर्मचाऱ्यांच्या मोठ्या गटावर विपरीत परिणाम होतो आणि हळूहळू त्यातील काही कर्मचारीही काम टाळण्याकडे झुकू लागतात. कुणी जाब विचारत नाही, कारवाई होत नाही, हे लक्षात आले, की कशाला करा इतकी मेहनत, असा पवित्रा घेणारे कर्मचारी आस्थापनेत वाढतात. आस्थापनेच्या कामगिरीवर नकारात्मक परिणाम, आस्थापनेतील वरिष्ठ, नेतृत्वपदी असलेल्यांची आस्थापनेच्या प्रगती, बांधिलकीप्रती शंका आणि आस्थापनेची उद्योग जगतात (खालावणारी) प्रतिमा असे ‘साइड इफेक्ट्स’ कामचुकार कर्मचाऱ्यांमुळे होतात.असे म्हणतात, की, अ मॅन इस द प्रोडक्ट ऑफ हिज पास्ट. व्यक्ती आज कशी आहे, ते त्याच्या/ तिच्या भूतकाळावर अवलंबून असते. कामचुकारपणाचे फायदे भूतकाळात अनुभवले असतील, कुठलीच जबाबदारी न घेता, स्वत:ला कुठलीच तोशिश न पडता एखाद्या व्यक्तीचे आयुष्य पुढे जात असेल, तर ती सोयीस्कर सवय, ती जीवनशैली व्यक्तीच्या अंगवळणी पडते. त्यातून बाहेर येऊन काही करायचे असल्यास कष्ट करणे, नकारांचा-अपयशाचा सामना करणे हे जीवनानुभव घ्यावे लागतात. काही व्यक्ती ‘कळतंय; पण वळत नाही,’ या वर्गातील असतात, तर काही स्वार्थी; स्वत:ही काही करायचे नाही आणि दुसऱ्यालाही काही करू द्यायचे नाही या वर्गातील.सर्वसामान्याच्या नजरेतून बघितले, तर हे योग्य वाटते; परंतु कामाप्रती उदासीनता, काम टाळण्याची वृत्ती निर्माण होणे हे वर्तनबदल एका रात्रीत, अल्पावधीत घडून येत नाहीत. समजून घेण्याच्या उद्देशाने व्यक्तीच्या अशा वर्तनामागे नेमके काय कारणीभूत आहे, हे जाणून घेण्याचा खराखुरा



प्रयत्न केला पाहिजे. एखादी व्यक्ती तिच्या / त्याच्या क्षमतेपेक्षा तसेच तिच्या / त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या पेक्षा कमी प्रतीचे काम करत असेल, तर त्यामागील कारण काय, त्या व्यक्तीची मनोधारणा काय, त्या व्यक्तीला काही अडचणी आहेत का? इतर कर्मचाऱ्यांकडून त्या व्यक्तीला कशी वागणूक मिळते आहे? भूतकाळात ती व्यक्ती चांगली कामगिरी करत होती, आता करत नाही, असे असेल, तर त्याचे कारण काय असे अनेक पैलू या वर्तनामागे असतात.आस्थापनेतील जबाबदारीनुसार काम न करणाऱ्या कर्मचाऱ्याशी त्याच्या / तिच्या वर्तनाबद्दल, कामगिरीबद्दल संवाद साधायची जबाबदारी मुख्यत्वे वरिष्ठ अथवा मनुष्यबळ विभागातील जाणकार व्यक्तीची असते. हा संवाद अवघड असतो; पण त्या संवादाची तयारी केल्यास, ‘गृहपाठ’ केल्यास, तो अवघड प्रसंग कर्मचारी, वरिष्ठ आणि आस्थापना या तीनही भागधारकांसाठी फायदेशीर ठरतो. या अवघड संवादाची तयारी कशी करावी?त्या कर्मचाऱ्याच्या कामगिरीनिगडित आकडेवारी; ज्याला इंग्रजीत केआरए म्हणजे ‘की रिझल्ट’ किंवा ‘रिस्पॉन्सिबिलिटी एरिया’ आणि आणि केपीआय म्हणजे ‘की परफॉर्मन्स इंडिकेटर’ असे म्हणतात. त्या आकडेवारीचा आढावा घेऊन त्यात काय दिसते, कामगिरी कशी आणि कुठे खालावली आहे हे कर्मचाऱ्याला निदर्शनास आणून देता आले पाहिजे. कामावर येण्याची वेळ, सुट्ट्या अशी कारणे असतील, तर ती माहितीही जवळ हवी. आस्थापनेची धोरणे, मूल्ये, काम करण्याची पद्धत हे कर्मचाऱ्याला त्याच्या / तिच्या आकलनक्षमतेनुसार सांगता येणे, याचा सराव करणे, मूळ विषय सोडून तो संवाद दुसरीकडे भरकटत जाणार नाही, व्यक्तीच्या स्वप्रतिमेला धक्का लागणार नाही, व्यक्ती नव्हे, तर ‘वर्तन’ हा संवादाचा केंद्रबिंदू राहील याची काळजी संवाद साधणाऱ्या वरिष्ठांनी घेतली पाहिजे. कर्मचाऱ्याशी हा संवाद कधी साधायचा, तो दिवस, वेळ हे कुठल्या महत्त्वाच्या मीटिंगआधी किंवा त्वरित, नंतर न ठरवता, एखादा कमी व्यस्त दिवस निवडणे योग्य. कामाच्या दिवसाच्या शेवटी किंवा आठवडी रजेच्या आधी ही मीटिंग न घेणे, कारण अगदी संयमाने आणि समजून घेण्याच्या उद्देशाने हा संवाद साधला, तरी कर्मचारी त्यास कसा प्रतिसाद देईल, हे सांगता येत नाही.कर्मचाऱ्यासमोर आकडेवारी, कामगिरीसंबधित माहिती मांडल्यावर कर्मचाऱ्याची बाजू ऐकून घेणे, कर्मचाऱ्याचे म्हणणे समजून घेण्यास प्रश्न विचारणे, कर्मचाऱ्याने काही वेगळी माहिती, आकडेवारी सांगितल्यास तिची शहानिशा करण्यास ती नमूद करून घेणे आणि सरतेशेवटी कर्मचाऱ्याच्या पुढील कामगिरीबद्दल स्पष्ट योजना कागदावर आणणे. कर्मचाऱ्याला काही वैयक्तिक अडचणी आहेत का? सहकर्मचाऱ्यांशी काही वाद-गैरसमज आहेत का? काम करताना संसाधने अपुरी आहेत का, असे सारे नमूद करावे. या संवादात चर्चिल्या गेलेल्या मुद्द्यांची कागदोपत्री नोंद करून, त्यावर कर्मचारी आणि वरिष्ठ यांनी सही करावी. हे काहीसे नियमावर बोट ठेवून वागणे आहे असे वाटले, तरी त्या संवादाचा हेतू आणि अपेक्षित परिणाम काळाच्या ओघात नजरेआड होऊ नये, विस्मृतीत जाऊ नये याकरता ही नोंद आवश्यक असते. पुढे ठरावीक काळानंतर त्या कर्मचाऱ्याच्या वर्तनाचा आणि कामगिरीचा आढावा सतत घेत राहणे, हेही तितकेच गरजेचे.आस्थापनेच्या प्रगतीचा; तसेच आस्थापनेत कार्यरत असलेल्या निष्ठावान, कुशल कर्मचाऱ्यांचा विचार करता, काही कर्मचारी कामाबद्दल, वर्तन सुधारण्याबद्दल, इतरांबद्दल अनास्था दर्शवत असतील आणि संधी देऊनही कामगिरीत चांगला बदल होत नसेल, तर अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काय निर्णय घ्यावा, हे अंतत: आस्थापना वरिष्ठांच्या अखत्यारित असते.एक नासका आंबा पेटीतील इतर आंबेही नासवू शकतो, हे आपण जाणतो.

# देवेंद्र फडणवीस म्हणजे महाराष्ट्राचे भीष्मच

## राज्यातील तरुण त्यांच्यासोबत-लोढा




**नागपूर**-देवेंद्र फडणवीस म्हणजे महाराष्ट्राचे भीष्म आहे असे विधान मंत्री मंगनप्रभात लोढा यांनी व्यक्त केले आहे. कारण भीष्मासारखीच सहनशीलता त्यांच्याकडे आहेत, असे म्हणत मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे.दरम्यान मंगलप्रभात लोढा म्हणाले की, आंतरवाली सराटीच्या घटनेत फडणवीसांचा हात नव्हता. हे ठढख मध्ये देखील स्पष्ट झाले आहे. तरीही फडणवीसांवर आरोपांचा भडीमार होत होता. पण ते शांत राहिले, असे म्हणत मंगलप्रभात लोढा यांनी फडणवीसांच्या सहनशीलतेचं कौतुक केल्याचे पाहायला मिळाले. नागपुरातील महारोजगार मेळाव्यात राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा हे संवाद साधत होते.आंतरवाली सराटीमध्ये लाठीचार्जचा जो प्रकार घडला त्याचा उल्लेख मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी केला. त्यांनी म्हटले की, आंतरवाली सराटीमध्ये जी घटना घडली त्यामध्ये देवेंद्र फडणवीसांचा काहीही दोष नव्हता. तरीही त्यांच्यावर आरोप करण्यात आहे. पण ते शांत राहिले. सत्ता गमावलेले नेते फडणवीसांबद्दल सातत्याने चुकीचा प्रचार करत होते. फेसबुकवर त्यांची बदनामी केली जात होती. पण तरीही फडणवीस शांत राहिले. आरोप झाल्यानंतरही फडणवीसांनी विकासाचे काम सुरु ठेवले. ते सहनशील आहेत म्हणून तरुण त्यांच्या पाठिशी आहे. फडणवीस तुम्ही जरी शांत राहिलात तरी तरुणशक्ती शांत बसणार नाही. ती तुमच्या सोबत उभी राहणार आहे.लातूरमध्ये बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, फडणवीस यांनी मंगल प्रभात लोढा यांच्या गळ्यात हात टाकून फिरावे.त्यांनी शब्द दिला आहे. वेळ मागितला आहे. आम्ही दिला. त्यांचा शब्द त्यांनी पाळावा. त्यांच्या मताला आम्ही मान दिला आता त्यांनी दिलेला शब्द पाळवा. आमचा अंत पाहू नका, २४ डिसेंबरनंतर तुम्हाला राज्यातील तरुण कुणासोबत आहे, हे समजेल, असे जरांगे पाटील म्हणाले.

# एकटा जीव सदाशिव

शिक्षण, करिअरसाठी आपण भरपूर नियोजन आणि आर्थिक तरतूद करून ठेवतो. काही अंशी तरतूद ही वृद्धापकाळासाठी पण असते; पण या वयात येणाऱ्या एकटेपणाचे, ‘सपोर्ट सिस्टिम’चे नियोजन कसे करायचे, याचा विचार आपण करतो?माणूस हा समाजप्रिय असतो. समाजात मिळून-मिसळून राहणे, लोकांशी संवाद साधणे या त्याच्या मूलभूत गरजा असतात. कोणत्याही वयात एकटेपणा नकोसा असतो. उतारवयात या एकटेपणातून ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक भावनिक-मानसिक समस्या उभ्या राहताना आज प्रकर्षाने दिसू लागल्या आहेत. मुले परदेशी अथवा दुसऱ्या घरात राहायला गेल्यानंतर, जोडीदाराचा वियोग किंवा संवाद साधायला कुणीही नसणे हा आज गंभीर प्रश्न दिसू लागलाय. एकटेपणातून नैराश्य येणे व आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेणे घटनांनी आपले मनही विचलित होते. यावर उपाय म्हणून अनेक संस्था या संवाद साधने/गप्पा मारण्यासाठी ‘पेड सर्व्हिस’ उपलब्ध करून देत आहेत. यातून दिवसातील काही तास एकटे राहणाऱ्या लोकांसाठी सुसह्य होत असले, तरी अशा सुविधा त्यांच्या एकटेपणावर खरेच मात करणाऱ्या ठरतील का, हा प्रश्न आहे.

करोना काळात ‘समर्थ भारत’ या प्रकल्पांतर्गत आम्ही रोज ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत होतो. करोनाची भीती, एकटेपण, आजूबाजूला माणसे दिसत नसल्यामुळे येणारे नैराश्य व उदासीनता या सगळ्या गोष्टी या लोकांमध्ये दिसत होत्या. एखाद्या दिवशी आमचा फोन राहिला, तर ही मंडळी न चुकता आम्हाला फोन करत असत. नियमित संवादामुळे या लोकांचे मन आनंदी व प्रफुल्लित राहायचे. एकूण काय, तर संवाद साधणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.खरे तर, आपण आपल्या आयुष्यात अनेक गोष्टींचे नियोजन करतो. शिक्षण, करिअर, पहिला पगार, लग्न, मुलांचा निर्णय, निवृत्ती असे बरेच काही. यामागे अनेकदा आर्थिक नियोजनालाच प्राधान्य असते. मात्र, निवृत्तीनंतर आर्थिक नियोजनासोबतच या कालावधीत मिळालेल्या अमाप मोकळ्या वेळेचा सदूपयोग कसा करायचा, मुले सोबत राहणार नसतील तर आपली ‘सपोर्ट सिस्टीम’ कशी निर्माण करायची, रिकामा वेळ कसा व्यतीत करायचा, आजारपण असेल, तर त्याचे व्यवस्थापन कसे असेल अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टींचे नियोजन किती जण करतात? अनेक जण निवृत्तीनंतर सेकंड इनिंगचे नियोजन करतात, ऑफिस सुटल्यानंतर हाती आलेल्या रिकाम्या वेळेचा विनिमय कसा करायचा याची शोधाशोध करतात, यातून पुरेसे समाधान मिळेलच असे नाही.आपल्या आयुष्यातील या महत्त्वाच्या टप्प्याचे नियोजन करणे ही अत्यावश्यक बाब आहे. या काळात सकारात्मक राहणे गरजेचे आहेच; शिवाय स्वीकारात्मक राहणेही अधिक गरजेचे आहे. आपल्या आयुष्यातील सगळ्या बऱ्या-वाईट गोष्टींचा स्वीकार हा प्रथम झाला पाहिजे. भूतकाळात जगणारे अनेक ज्येष्ठ नागरिक भविष्यातील आनंद अनुभवण्याची संधी सोडून देतात. वय कोणतेही असो, आपल्याला वर्तमानकाळात



जगता आले पाहिजे.वयाची ८० वर्षे पार केलेल्या राधाबाई मला मध्यंतरी भेटल्या होत्या. आरोग्यपूर्ण आयुष्याच्या त्या मानकरी. सिनेमा, नाटक, सामाजिक काम, पिकनिक या सगळ्याचा आस्वाद घेणाऱ्या राधाबाई स्वतंत्र्य राहत होत्या. या पुढील वयातील संभाव्य काळजी आणि धोके पाहता, मुले आपल्याला परदेशात राहायला बोलवत असल्याचे त्यांनी मला सांगितले. उद्या आजारी पडले, अंथरुणावर पडून राहिले, तर माझे कोण करणार? मुलांसह राहिले तर किमान माझे सगळे ते करू शकतील व त्यांनाही माझे केल्याचे समाधान मिळेल, असा त्यांचा विचार होता. राधाबाईंनी मुलांच्या निर्णयाचा स्वीकार केला व गावातील सर्व मालमत्ता विकून त्या मुलाकडे स्थायिक झाल्या. मला तिकडे करमणार नाही, माझे सगळे काही पुण्यात आहे, येथील मालमत्ता कशाला सोडायची अशा प्रश्नांना त्यांनी तात्काळ उत्तरे शोधून निर्णय घेतला होता. आपले वय वाढत असताना परिस्थितीचा स्वीकार करणे हे महत्त्वाचे आहे.वाट्याला आलेले एकटेपण हे आपल्या आग्रही स्वभावामुळे तर आलेले नाही ना, याचा विचार सगळ्यांनी करणे गरजेचे आहे. असे म्हणतात, म्हातारपण हे दुसरे बालपण असते. सहजतेने मुलांनी आपली जबादारी घेतली, तर या दुसऱ्या बालपणातील आनंद आपण जरूर उपभोगला पाहिजे. ‘मी आणि माझे’ न करता मुलांच्या कलेने जात उतारवयातील आपले आयुष्य अधिक सकस व समृद्ध कसे होईल ते पाहणे आवश्यक आहे. यासाठी हेकेखोरपणा बाजूला ठेवता आला पाहिजे.खरे तर आपण आपले शिक्षण, करिअर याचे नियोजन खूप विचारपूर्वक करतो. त्यासाठी कष्टही घेतो. मात्र, उतारवयातील माझे प्रश्न मी कसे सोडविणार? याचा फारसा विचार कधीच करत नाही. माझी मुले परदेशात गेली तर, मुले वेगळी राहिली तर, मुलांनी जवळ राहून माझ्याशी संवाद ठेवला नाही तर, संपूर्ण दिवस कसा व्यतीत करायचा, भिशी-हास्य क्लब-भटकंती याबरोबरच इतर ‘प्रॉडक्टिव्ह’ उपाय काय असतील, अशा अनेक प्रश्नांचा विचार करून आपण आपल्या उतारवयातील आयुष्याचे नियोजन केले पाहिजे.त्या मनाने परदेशातील लोक खूप विचारपूर्वक आयुष्यातील या टप्प्याचे नियोजन करतात. अगदी तारुण्यात याची पूर्वतयारी सुरू करतात. या वयात आपल्याला आपल्यासाठी उत्तम पर्याय निवडता आला पाहिजे. मात्र, त्या करिता विविध पर्यायांची चाचपणी करण्याची कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. नेमका व उत्तम पर्याय शोधताना मात्र आपला असा त्यातील एक विचार हवा. माझे आजारपण, माझे एकटेपण, माझ्या विविध गरजा कशा भागविल्या जातील, एखादे मोठे ऑपरेशन झाले, तर अशा क्रमाने गरजा कागदावर लिहित त्याचे नियोजन केले गेले पाहिजे. उतारवयातील प्रश्न, समस्या, अडचणी यावरही विचार व नियोजन हवेच.मुलांनी स्वतंत्र प्रपंच थाटताच, वसंतराव व वसुधाताईंनी शहरातील सर्व सोयींयुक्त अशा वृद्धाश्रमात आपले नाव नोंदवले व चार समवयस्क लोकांसह जगण्याची सवय करून घेतली. लॉकडाउनच्या आधी माझ्याकडे हे दोघे आले होते. निर्णयातील स्पष्टता आणि कोणतीही तक्रार न करता दाखवलेला समजूतदारपणा मला त्यांच्याकडे पाहून जाणवला. व्यायाम, गप्पा, वाचन, सिनेमा-नाटकाला जाणे असा भरगच्च दिनक्रम या दोघांनी स्वीकारला. उद्या दोघांपैकी एक जण मागे राहिले, तर त्याला एकटे वाटायला नको इतका साधा सरळ विचार या मागे होता. खरे तर, परिस्थितीचा स्वीकार केल्यास त्यावर अधिक चांगल्या पद्धतीने उत्तर शोधता येते.सगळ्यांचे एक अंतर्मन असते. वय वाढत असताना या अंतर्मनाचे ऐकणे महत्त्वाचे ठरते. ज्या क्षणाला, आपले मन आधाराचा शोध घेऊ लागते; त्या क्षणाला आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून आपण आपल्याकरिता उत्तम अशा जोडीदाराची किंवा व्यवस्थेची निवड केली पाहिजे. आपला अहंकार, हट्ट या गोष्टी थोड्या सारून परिस्थितीचा वेध घेता आला पाहिजे. एक दिवस आपण पूर्णपणे पराधीन होणार आहोत याचे भान जपून आपल्या आयुष्याकडे पाहिल्यास अनेक प्रश्नांवर सुयोग्य असा मार्ग नक्कीच काढता येतो.एकटेपणावर मात करण्याकरिता आयुष्यात पुन्हा एकदा जोडीदार निवडणे यालाही आज समाजमान्यता मिळू लागली आहे. आज अनेक ज्येष्ठ नागरिक आयुष्याच्या ‘सेकंड इनिंग’मध्ये एकटेपणावर मात करण्याच्या दृष्टीने लग्न अथवा ‘लिव्ह इन’मध्ये राहतात. उतारवयातील एक्तेपानंतर मात करत ते अधिक चांगल्या पद्धतीने जगत आहेत.एकूण काय, तर उतारवयात येणाऱ्या एकटेपणावर उपाय शोधणे आपल्याच हाती असते. शरीर थकत असताना, थोडे समजुतीने, थोडे दुसऱ्याचे ऐकत यावर उपाय शोधला, तर याचा सगळ्यांनाच फायदा मिळतो. नाही का?

# कला केंद्रांच्या नियंत्रणासाठी एसओपी बनवण्यात यावी–उपसभापती डॉ.गोऱ्हे

**नागपूर । प्रतिनिधी**

कला केंद्रावर अल्पवयीन मुली असू नयेत यासाठी या कला केंद्रांची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. पोलीस,महसूल,आरोग्य,महिला व बालकल्याण व कामगार विभागाच्या सहकार्याने कला केंद्रांच्या नियंत्रणासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) बनवण्यात यावी,असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

कला केंद्रांबाबत एसओपी तयार करणे संदर्भात विधान भवनात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस छत्रपती संभाजीनगरचे पोलीस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण व पोलीस अधीक्षक मनीष कलवानीया प्रत्यक्ष उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर,नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक शहाजी उमप,अहमदनगर पोलीस अधीक्षक राकेश ओला,लातूर पोलीस अधीक्षक



सोमय मुंडे,कलाताई शिंदे,सुनीताताई मोरे उपस्थित होते.उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या,कला केंद्रावर काम करणाऱ्या महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी भरोसा सेल,महिला दक्षता समितीसह पोलीस,महसूल,आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी या केंद्रांना नियमित भेटी देऊन त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. कला केंद्राच्या ठिकाणी महिला राहत असलेल्या ठिकाणीची जागा सुरक्षित आहे का यासह केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडत नसल्याची खात्री करावी. याबरोबरच कला केंद्रांवर कोणतेही अवैध व्यवसाय होत नाही याची खातरजमा करावी. कला केंद्रावर काम करणाऱ्या महिलांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला व बाल विकास विभागाची मदत घ्यावी सूचना उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या.डॉ. गोऱ्हे म्हणाल्या,कोविड मध्ये विधवा महिलांना मदत करण्यासाठी समिती केली होती. त्याच धर्तीवर कला केंद्रातील मुलींसाठी समिती नेमून त्या दृष्टीने त्या मुलींचे पुनर्वसन करण्यावर भर देता येईल. कला केंद्रावर काम करणाऱ्या महिलांच्या अल्पवयीन मुलींना शिक्षण देण्यासाठी त्यांच्या पालकांना विश्वासात घेऊन त्या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच कला केंद्रांवर काम करणाऱ्या कलाकारांच्या सामाजिक पुनर्वसनासाठी त्यांची नोंदणी असणे आवश्यक आहे. यासाठी कामगार विभागामध्ये जशी कामगारांची नोंदणी केली जाते त्याच पद्धतीने कला केंद्रावरील कलाकारांची नोंदणी कामगार विभागाने करावी. यामधे तमाशा,लोक कलावंत,कला केंद्रावरील महिलांचा समावेश करावा,अशा सूचनाही त्यांनी दिल्या.बैठकीत संबंधित जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांनी आपापल्या जिल्ह्यातील कला केंद्राच्या सद्य:स्थितीची माहिती दिली.

# कांदा उत्पादकांचे नुकसान होऊ नये यासाठी केंद्रीय वाणिज्य मंत्र्यांशी बोलणार-उपमुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

कांद्याच्या वाढत्या भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने निर्यात बंदीचा निर्णय घेतला आहे. परंतु, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याशी बोलणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म.नि.प.नियम २८३ अन्वये सूचना मांडली. त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, देशात सध्या कांदा उपलब्ध आहे. निर्यातीसाठी परवानगी दिल्यास अडचण निर्माण होईल. शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी सरकार कांदा खरेदी करण्यास तयार आहे. गडचिरोली जिल्ह्यात रोजगाराला चालना देणार – उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस नागपूर:मोहाच्या फुलापासून इथेनॉलसारखे इंधन तयार करण्यास प्राधान्य देऊन गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी बांधवांच्या रोजगाराला चालना देणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषद मध्ये ११ डिसेंबर ला सांगितले.सदस्य सत्यजित तांबे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील दारू निर्मितीविषयी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता, त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डॉ. अभय बंग हे गडचिरोली जिल्ह्यात व्यसनमुक्ती शिबिरे राबवत आहेत. जिल्ह्यातील व्यसनमुक्ती आणि दारू निर्मिती विरोधात धोरण ठरविण्यात येणार आहे. हे धोरण ठरविताना डॉ. बंग यांनाही विश्वासात घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले की, गडचिरोली जिल्ह्यात मोहाच्या फुलांसदर्भात माहिती घेतली जाईल. तेथे नैसर्गिक संपत्तीपासून उद्योग वाढीसाठी, आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध करणे, व्यवसाय वृद्धी करता निर्णय घेण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# बल्लारपूर पब्लिक स्कूल, मूल येथील विद्यार्थिनीचे ५१ वे तालुकास्तरीय विज्ञान व शैक्षणिक साहित्य प्रदर्शनीमध्ये सुयश

**मूल । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ मूल द्वारा संचालीत बल्लारपूर पब्लिक स्कूल, मूल येथील विद्यार्थांनी ५१ वे तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनी टेकाडी येथे आयोजित केले होते. या स्पर्धेमध्ये तालुक्यातील शंभरावर विद्यार्थांनी सहभाग घेतला होता. यात बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल येथिल विद्यार्थांनी बिगर आदिवासी माध्यमिक गटातून विज्ञान प्रदर्शनी मध्ये कुमारी उत्कर्षा सिकंदार वाळके, कुमार अंश मनोज तेलसे याने प्रथम क्रमांक पटकविला आहे.तसेच प्राथमिक गटातून विज्ञान प्रदर्शनी मध्ये कुमार शाक्य रजित लाकडे व कुमारी उर्वशी बंडू पेंदोर यांनी तृत्तीय क्रमांक पटकविला आहे. तसेच माध्यमिक गटामध्ये वक्तृत्व



स्पर्धा घेण्यात आली त्यामध्ये कुमारी कशिश छगन रामटेके हिने तृतीय क्रमांक पटकविला आहे.

यांच्या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य विनोद तसेच मार्गदर्शन शिक्षक सुरज वसाके, तोषी जयस्वाल, शिरीषा मेडपल्लीवार, प्रणित नमुलवार, आदी शिक्षक व शिक्षिका आणि विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी शाळेचे संपूर्ण शिक्षक, शिक्षिका, आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# हत्तींमुळे घरांचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये वाढ करणार– वनमंत्री सुधीर मुनगंटीवार



**नागपूर । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यामध्ये जंगलव्याप्त क्षेत्र असल्यामुळे येथील हत्तींचा उपद्रव शेती तसेच मानवी वस्त्यांपर्यंत होत आहे. या हत्तींमुळे घरांचे नुकसान झाल्यास द्यावयाच्या नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये वाढ करण्याचे निर्देश वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ११ डिसेंबर ला येथे दिले.


वनमंत्री ना.मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली गडचिरोली जिल्ह्यातील हत्ती व वाघ यांच्यामुळे होणाऱ्या संपत्तीच्या नुकसानाबाबत सेमिनरी हिल्स येथील वन विभागाच्या हरी सिंह सभागृह येथे आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार देवराव होळी, कृष्णा गजबे, सुभाष धोटे, वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणू गोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वन संरक्षक वन बल प्रमुख शैलेंद्र टेंभूर्णीकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता, नागपूर मुख्य वनसंरक्षक श्रीमती लक्ष्मी, गडचिरोली मुख्य वनसंरक्षक एस. रमेश कुमार आदी उपस्थित होते.गडचिरोलीचा दोन तृतीयांश भाग जंगलाने व्यापलेला आहे. मागील काही वर्षात २३ हत्तींचा कळप येथे आलेला होता. या कळपामुळे येथील घरांचे नुकसान होत आहे. नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये वाढ करण्यात यावी. तसेच हत्तींमुळे काढणी केलेल्या धान तसेच शेतमालाचे नुकसान झाल्यास भरपाई देण्याबाबत तरतूद करावी, अशा सूचना वनमंत्री ना . मुनगंटीवार यांनी दिल्या.जंगलालगत असलेल्या पडीक जमिनीवर वृक्ष लागवड करण्याच्या शक्यतेची तपासणी करावी. गडचिरोली जिल्ह्यातील वाघ व हत्तींचा वावर असलेल्या ५२ गावांमध्ये वनहद्दीवर कुंपण उभारण्याची कार्यवाही करावी. याकरिता आवश्यक निधी श्यामाप्रसाद मुखर्जी योजना किंवा जिल्हा योजना निधीमधून घेण्यात यावा. तसेच प्रलंबित नुकसान भरपाईच्या प्रकरणातील गावकऱ्यांना तत्काळ अर्थसहाय्य देऊन याबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# आष्टीत महेश आयुर्वेद महाविद्यालयातिल शिष्योपनयन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या कार्यक्रमाच माजी आ.भीमराव धोंडे यांनी केले उद्घाटन

## महेश आयुर्वेद महाविद्यालयातुन समाजाभिमुख डॉक्टर घडणार– मा.आ.भीमराव धोंडे

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश आयुर्वेद महाविद्यालयात संस्थेने दर्जेदार आणि गुणवंत प्राध्यापकांची उपलब्धता आयुर्वेद महाविद्यालयात केली असुन महाविद्यालयातुन समाजाभिमुख डॉक्टर घडणार असल्याची ग्वाही संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.भीमराव धोंडे यांनी महेश आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रथमवर्ष प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्योपनयन कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी दिली. यावेळी मंचावर संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ डी बी राऊत, शिवदास विधाते,दत्तात्रय गिलचे, माऊली बोडखे,संजय शेंडे,राजु काका धोंडे,पत्रकार उत्तमराव बोडखे,प्राचार्य डॉ सचिन काकडे , उप प्राचार्य डॉ.मोहिनी गोसावी, डॉ चंद्रकांत गोसावी,डॉ.प्रताप मार्कंडे,डॉ राहुल काळे,डॉ.पुनम मार्कंडे,डॉ केतन गर्जे, डॉ.यादव,डॉ.पठाडे,आदींची उपस्थिती होती. पुढे बोलतांना मा .आ.भीमराव धोंडे म्हणाले की महाविद्यालय जरी नविन असले तरी पालकांनी महाविद्यालयावर विश्वास ठेवुन निवड प्रक्रियेत महाविद्यालयाची निवड केल्या बद्दल पालकांचे धन्यवाद व्यक्त केले तसेच आपल्या पाल्यांची कसल्याही – प्रकारची चिंता पालकांनी करु नये आता आम्ही आपल्या पाल्यांचे पालक असल्याचा विश्वास देत भौतिक सुविधा व गुणवत्ता वाढीवर महाविद्यालय – प्रशासनाचा भर असल्याचे सांगीतले तसेच यावेळी आनंद शैक्षणिक संकुल मधिल महाविद्यालयांनी गुणवत्तेच्या – बाबतीत आजवर केलेल्या प्रगतीचा आलेख माडला प्रमुख पाहुणे म्हणुन बोलताना डॉ.डी बी राऊत यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांच्या –




पालकांनी किती मोठे कष्ट उपसुन त्यांना इथपर्यंत आणले याची जाण ठेवुन त्यांनी बाळगलेले स्वप्न पुर्ण करावे पुढील वाटचाल अवलंबण्याचे आवाहन केले संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे साहेब यांचे आष्टी सारख्या ग्रामीण भागात मेडिकल कॉलेज चालू व्हावे अनेक वर्षांपासून चे स्वप्न आज साकार झाले आहे.तसेच एम.बी.बी.एस ला नंबर लागला नाही आयुर्वेदला नंबर लागला म्हणुन – विद्यार्थ्यांनी कुठेही खचुन जाण्याची गरज नसुन आयुर्वेदाची ताकद आता – जगासमोर आलेली आहे आणि आयुर्वेदिक उपचार हे किती प्रभावी आणि दीर्घकाळ टिकणारे आहेत याची अनेक उदाहरणे त्यांनी यावेळी देत भविष्यात – आयुर्वेदीक डॉक्टरांना किती मोठा स्कोप आहे या विषयी आपल्या दीर्घ मार्गदर्शनात विषद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ.चंद्रकांत गोसावी म्हणाले national commission for indian system of medicine, minister of-yush govt of india New Delhi या केंद्रीय परिषदेनुसार बी.ए.एम.एस या कोर्स बदलचे सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या वतीने प्रशासन अधिकारी डॉ.डी बी राऊत,शिवदास विधाते, दत्तात्रय गिलचे, माऊली बोडखे, संजय शेंडे,प्राचार्य डॉ.सचिन काकडे,उप प्राचार्य डॉ.मोहिनी गोसावी,डॉ चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले होते.यावेळी आनंद शैक्षणिक संकुल मधिल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्रीराम आरसुळ, इंजिनिअरिंग कॉलेज प्राचार्य संजय बोडखे,डि फार्मसी,बी फार्मसी,एम फार्मसी कॉलेज चे प्राचार्य डॉ सुनील कोल्हे,कृषी तंत्र निकेतन चे प्राचार्य सानप जयदीप,अन्नतंत्र कॉलेज चे प्राचार्य साईनाथ मोहळकर,नर्सिंग कॉलेज चे प्राचार्य वनवे सर,पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका विद्यालय चे प्राचार्य डॉ टापरे के.एस व विद्यार्थी,पालक,शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बी बी खेमगर यांनी केले तर आभार डॉ. मोहिनी गोसावी यांनी मानले.

## साहेब! आम्हाला कधी मिळणार सामुहिक वन हक्क?

# टाटा सामाजिक संस्थेचे संशोधन: सामुहिक वनहक्कासाठी ६१० गावे प्रतीक्षेत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


दिनांक ०८ डिसेंबर २०२३, शुक्रवार रोजी मा.सा. कन्नमवार, जिल्हा परिषद चंद्रपुर येथे वनहक्क कायदाविषयी टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबईच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत १०० सामुहिक वनहक्क ग्रामसभेसाठी केलेल्या कार्याचा अहवाल सादर करण्यात आला. कार्यशाळेत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर विवेक जॉन्सन, प्रकल्प अधिकारी, जिल्हा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, तथा सहायक जिल्हाधिकारी चंद्रपूर मुरुगनाथम एम., टाटा सामाजिक संस्था प्रो. डॉ. गीतांजॉय साहू, , मुंबई, जिल्हा वनहक्क व्यवस्थापक स्नेहा, ददगाळ, प्रमुख पाहूणे उपस्थितीत होते.अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे ) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम




२०१२ नुसार महाराष्ट्रात एकूण ८५३६ गावांना सामुहिक वन हक्क प्राप्त झाले असून यातील ४८४ गावे चंद्रपूर जिल्ह्यतील आहेत. तरीही केलेल्या अध्ययनात असे दिसून आले कि प्राप्त क्षेत्रात व ग्रामसभांना अपेक्षित वन क्षेत्रात तफावत दिसून येत आहे. तसेच वन हक्क कायदा २००६ येऊन १७ वर्षे उलटूनही जिल्हात ६१० ग्रामसभा वन हक्क झालेले नाहीत. प्राप्त होणे गरजेचे असतांना महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा हा सामुहिक वनहक्क क्षेत्राच्या मान्यतेतील आघाडीच्या जिल्ह्यांपैकी एक आहे. महाराष्ट्रात एकूण ८५३६ ग्रामसभांना सामुहिक वनहक्क दावे प्राप्त झाले असून त्यापैकी ४८४ ग्रामसभा चंद्रपूर जिल्हयातील आहेत. त्यामुळे जवळपास जिल्हात ४ लाख वननिवासी समुदाय वन संसाधनपासून वंचित आहेत. या संदर्भातील अहवाल या प्रसंगी प्रकाशित करण्यात आला. कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रकल्प अधिकारी यांनी या अहवालाची दखल घेऊन प्रकरणे निकाली काढण्याबाबत योग्य कार्यवाही साठी संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदेश दिले. कार्यशाळेला नरेगा विभागाचे अधिकारी, जागृती संस्था, राधा ऑर्गनायझेशन, वसा, अंबुजा फॉउंडेशन, एफ ई एस संस्था, रिवाई संस्था, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामसभा प्रतिनिधी, वनहक्क समन्वयक, प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी, टी आय एस एस टीम चे प्रतिनिधी, उपस्थित होते.

# २४ जिल्ह्यांत आतापर्यंत २२१६ कोटी अग्रीम पीकविमा मंजूर, कृषिमंत्री मुंडे

**नागपूर**–राज्यातील २४ जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामात पावसाच्या खंडासह विविध नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले, त्याबाबत पंतप्रधान पीकविमा योजनेंतर्गत २४ जिल्ह्यांतील सुमारे ५२ लाख शेतकऱ्यांना सुमारे २२१६ कोटी रुपयांचा अग्रीम पीकविमा २५ टक्क्यांनुसार मंजूर करण्यात आला. त्यापैकी आज सकाळपर्यंत १६९० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले असून, ६३४ कोटी रुपयांचे वितरण वेगाने सुरू आहे, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सोमवारी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाला उत्तर देताना दिली.धनंजय मुंडे यांनी सांगितले की, २४ जिल्ह्यात स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून झालेल्या



नुकसानीला अनुसरून संबंधित विमा कंपन्यांना २५ टक्के अग्रीम पिक विमा देण्याबाबत जिल्हा प्रशासनाच्या स्तरावरून अधिसूचना काढण्यात आल्या होत्या. मात्र त्याविरोधात काही कंपन्यांनी जिल्हा प्रशासन व विभागीय स्तरावर अपिल केले. ते फेटाळल्यानंतर काही पिक विमा कंपन्यांनी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती धाव घेतली. यादरम्यान सरकारने हवामान तज्ज्ञ व कृषी विद्यापीठांच्या तज्ज्ञ व्यक्तींचे सहकार्य घेऊन २१ दिवसांच्या पावसाच्या खंडाच्या नियमाला अनुसरून तसेच विविध तांत्रिक बाबींनुसार शेतकऱ्यांचे झालेले नुकसान कंपन्यांच्या पुढे सिद्ध करून कंपन्यांना विमा देण्यास भाग पाडले.काही विमा कंपन्यांचे अपील अद्याप सुनावणीस्तरावर आहेत. ते निकाली निघाल्यानंतर मंजूर पीकविम्याच्या रकमेत आणखी मोठी वाढ होईल. काही जिल्ह्यांतील काही शेतकऱ्यांना १ हजार रुपयांपेक्षा कमी विमा रक्कम मिळाल्याच्या बाबी काही सदस्यांनी उपस्थित केल्या. त्यानुसार अशा शेतकऱ्यांना किमान १ हजार रुपये पीकविमा मिळेल याची खातरजमा केली जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले.तत्पूर्वी पीकविम्या संदर्भात विधानपरिषदेत आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार अरुण लाड, आमदार जयंत आसगावकर, आमदार राम शिंदे, आमदार प्रवीण दरेकर, आमदार अमोल मिटकरी आमदार शशिकांत शिंदे यांसह विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनीही प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित केला होता. आमदार एकनाथ खडसे यांनी केळी पीकविमा, आमदार जयंत पाटील यांनी भातशेतीचे झालेले नुकसान यावर कृषीमंत्र्यांचे लक्ष वेधले होते.

# भाजपाच्या आजवरच्या यशात वैचारिक लढाईचे मोठे योगदान : सुधीर मुनगंटीवार

## माधव भांडारी यांच्या दृष्टीकोन या लेखसंग्रहाचे पुण्यात प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

भाजपाच्या आजवरच्या यशात वैचारिक लढाईचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी येथे केले. भाजपा प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांच्या दृष्टीकोन या लेखसंग्रहाचे प्रकाशन करतांना ते बोलत होते. माधव भांडारी यांच्यासारखे विचारवंत समाजाची वैचारिक मशागत करत आहेत याचा आनंद आहे, असेही ते म्हणाले. पुण्यातील डेक्कन येथील सावरकर अध्यासनात झालेल्या या प्रकाशन समारंभात पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मिलिंद एकबोटे, उत्कर्ष प्रकाशनचे जोशीकाका हेदेखिल उपस्थित होते. यावेळी बोलतांना ना.सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की, भाजपाच्या या वैचारिक लढाईत माधव भांडारी यांचे योगदान महत्वपूर्ण असून कार्यकर्त्यांसोबतच समाजाची वैचारिक मशागत करण्याचे काम त्यांच्या लेखनातून होत आहे. मनात कितीही द्वंद्व असले आणि समोर कितीही विरोध असला तरीही निश्चलपणे काम करत राहणारी ही व्यक्ती आहे.ना.सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की, आज समाजात विषारी विचार पसरविणाऱ्या शक्तींपासून समाजाला वाचविण्याकरता आपल्याला अधिक शक्तीने काम करण्याची आवश्यकता आहे, ती वैचारिक शक्ती पुरविण्याचे काम पुस्तके करतात, असेही ते म्हणाले. या पुस्तकांच्या रूपानेच पुढील पिढ्यांच्या हाती आपण वैचारिक सोने देवू शकतो. ते पुढे म्हणाले की ही विचारांची व दृष्टीकोनाची लढाई अत्यंत महत्वाची आहे. काही गट स्वतः सोने पांघरून समाजाला विषारी विचारांच्या चिंध्या देत



आहेत. मेंदू बधीर करून त्यात सोशल मिडियातून विषारी विचारांचे सॉफ्टवेअर भरण्याचे काम अर्बन नक्षलवाद्यांकडून सुरू आहे. मात्र तरीही आज भारतीय संस्कृतीला जागतिक मानसन्मान मिळत आहे. या देशाच्या संस्कृतीने विजेत्यांची नव्हे तर नेहमीच सत्याची बाजू घेणे आणि सत्याचा सन्मान करणे शिकवले आहे. या देशात विजेता नादिरशाह नव्हे तर देश व समाजासाठी त्याग करणारे त्यागमूर्ती राणा प्रताप आणि गौतम बुद्ध हेच आदर्श मानले गेले आहेत. हीच संस्कृती जग आज स्वीकारत आहे. अमेरिकेत २० लक्ष विद्यार्थी संस्कृत शिकत आहेत. जर्मनीत इंडॉलॉजी विषयाला विद्यार्थ्यांची सर्वाधिक पसंती मिळते आहे. ज्या देशात केवळ एकच प्रेषित मानत होते, त्या देशातील अबुधाबीत आज जगातील सर्वात मोठे हिंदू मंदिर उभारले जात आहे. तेथील सरकारने डिपार्टमेंट ऑफ टॉलरन्स सुरू केले आहे. आज जग सोन्याच्या पेल्यातील विष नाकारून भारतीय संस्कृतीचे अमृत स्वीकारत आहे, जगातील सर्व विचार हे अर्धवट असून भारतीय विचार हा पूर्णत्वाचा आणि सहिष्णुतेचा आहे. मात्र विद्या व संस्कृतीच्या या माहेरघरातूनच विद्या व संस्कृती हद्दपार होणार नाही याची काळजी आपल्याला घ्यावी लागेल, असेही ते म्हणाले. यावेळी माधव भांडारी यांनी सदर पुस्तकाची व लेखांची पार्श्वभूमी सांगितली तर चंद्रकांतदादा पाटील व केशव उपाध्ये यांनी देखिल या पुस्तकाबद्दल आपले विचार मांडले. उत्कर्ष प्रकाशनने आजवर केलेल्या कार्याचेही कौतुक ना.सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

# जमिनीचा वाद बेतला जीवावर, दोन सख्ख्या भावाने केली चुलत भावाची हत्या

**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या इंझाळा गावात संपत्तीच्या वादातून दोन सख्ख्या भावाने चुलत भावाची हत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मनोज ललित जावंधिया( वय ४१वर्ष )असे मृतकाचे नाव आहे तर सतीश विनोद जा सुमित विनोद जावंधिया असे आरोपींचे नाव आहे आरोपींना पुलगाव पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे.गेल्या अनेक वर्षापासून शेतजमितीच्या हिस्से वाटणीवरून वाद सुरू होता मनोज जावंधीया हा विनोद जावंदियांच्या परिवाराशी नेहमी भांडत होता घराजवळ काडी घेऊन यायचा व दहशत पसरवायचा मनोज जावंधीया याच्यावर यापूर्वीसुद्धा



अनेक गुन्ह्याची नोंद असल्याची माहिती मिळत आहे. सतीश व सुमित हे दोघे शेतामध्ये गेले असता मनोजही तिथे होता मनोज शी वाद झाला व सतीश व सुमित या दोघांनी सब्बल तसेच लाकडी काठीने डोक्यावर पायावर हनुवटीवर वार करून मनोजला जागीच ठार केले यावेळी मनोज ची आई सुद्धा तेथे होती तिने दिलेल्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून दोन्हीही आरोपीला अटक केली आहे. पुलगाव पोलिस स्टेशन गुन्हा क्र.९९८/२३ कलम ३०२,५०४,३४ भारतीय दंड विधानानुसार गुन्हा दाखल केला आहे.या घटनेने गावांमध्ये एकच खळबळ निर्माण झाली असून पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहे एक दिवस आधी आरोपीने पुलगाव पोलिसांना मृतकाच्या त्रासाबद्दल तक्रार देऊन पोलिस संरक्षणाची मागणी केली असल्याचे कळते.

# अयोध्या निमंत्रण अक्षता कलशाचे पुलगावात जल्लोषात स्वागत

**पुलगाव । प्रतिनिधी**

श्रीरामजन्मभूमी अयोध्या येथे प्रभु श्रीराम २२ जानेवारीला विराजमान होणार आहेत. या निमित्ताने देशात घरोघरी निमंत्रण देण्यासाठी अयोध्येहून निमंत्रण अक्षदा पोहचत आहे. तालुका केंद्रावर अक्षदा कलश दि.१० डिसेंबर ला रवाना झाले. पुलगाव नगरीत अक्षदा कलशाचे आगमन होताच जल्लोषात स्वागत करण्यात आले.

स्थानिय देवळी नाक्यावर अक्षदा कलश पोहचताच सुशोभित मंचावर ठेऊन त्यांचे पुजन करण्यात आले. यावेळी शहरातील विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुजनानंतर कलश डोक्यावर घेऊन श्रीराम दिंडी काढण्यात आली. यात प्रभु श्रीरामाची प्रतिमा असलेला रथ, भजन दिंड्या, बँड पथकाचा समावेश होता. श्रीराम दिंडी




जात असलेल्या मार्गावर सडा टाकून, रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.अंगणात दिव्यांची आरास करण्यात आली होती. घरोघरी कलशाचे पुजन करण्यात येत होते. दिंडीत सहभागी भक्तांसाठी ठीक ठिकाणी प्रसाद, अल्पोहार, चहा, पाणी, सरबत याची जनतेनी स्वयंस्फुर्त व्यवस्था केली होती. ठीक ठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी सुरु होती.या श्रीराम दिंडी व स्वागत यात्रेचा समारोप श्रीराम मंदिर, वसिष्ठाश्रम येथे महाआरती व प्रसाद वितरण करून झाला. या स्वागत यात्रेत मोठया संख्येने महिला, पुरुष व युवक सहभागी झाले होते.

# प्रलंबित व न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा पाठ पुरावा करा–जिल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत पोलीस तपासावर प्रलंबित असलेल्या गुन्हे व न्यायप्रविष्ठ प्रकरणाचा पाठपुरावा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचा आढावा घेतांना ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त बाबासाहेब देशमुख, पोलीस निरीक्षक महेश कोंडावार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहायक प्रकल्प संचालक प्रणव बक्षी, विधी अधिकारी अनिल तानले आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले,



अनुसूचित जाती,जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता तालुकास्तरावर गठीत समितीच्या नियमित बैठका घ्याव्यात. गुन्हा दाखल व अर्थसहाय्यासाठी प्रलंबित प्रकरणांची माहिती घ्यावी. असेही ते म्हणाले.घरकुल योजनांचा आढावा घेतांना जिल्हाधिकारी म्हणाले, रमाई आवास, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना, वसंतराव तांडा वस्ती सुधार योजना तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील त्रुटींची पूर्तता करावी. संबंधित आवास योजनेची तालुकास्तरावर यादी तयार करून जिल्हास्तरावर पाठवावी. गटविकास अधिकाऱ्यांकडून तांडा वस्तीचे प्रस्ताव मागवून घ्यावे, सदर योजनेचे प्रस्ताव प्रलंबित असल्यास पूर्तता करून जिल्हास्तरावर मंजुरीसाठी पाठवावे. योजनेचा पाच वर्षाचा आराखडा तयार करताना अनुज्ञेय असलेली सर्व प्रकारची कामे प्रस्तावित करूनच आराखडा तयार करण्याच्या सुचना त्यांनी बैठकीत दिल्या.यावेळी दुरदृष्यप्रणालीद्वारे संबधित तालुक्याचे उपविभागिय अधिकारी, नगरपंचायतचे मुख्याधिकारी तसेच गटविकास अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# संस्कृती विद्यालयाचे विज्ञान प्रदर्शनीत यश



**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील डोमा येथील संस्कृती माध्यमिक विद्यालयच्या विद्यार्थ्यांनी खडसंगी येथे झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विविध स्पर्धेत भाग घेऊन यश प्राप्त केले.प्राथमिक गैरआदिवासी गटातून विज्ञान प्रतिकृती मध्ये क्षीतिज कारू मुन याचा प्रथम क्रमांक आला. महेश विलास सेलोरे याचां निबंध स्पर्धेत दुसरा तर प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक आला.प्रयोगशाळा परिचर गटातून शाळेतील परीचक नरेश उईके यांचा प्रथम क्रमांक आला यावेळी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात चार बक्षीस प्राप्त केले आहे.हे बक्षीस आमदार किर्तिकुमार भांगडीया व आमदार सुधाकर अडवाले यांच्या हस्ते देण्यात आले.या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मुख्याध्यापक प्रदीप गारघाटे शिक्षक अतुल राखडे यांनी केले.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .